## जनसंपर्क विभाग

### विद्यार्थी परिषद निवडणूक कार्यशाळा,गुरुवार, दि. २७ जून, २०१९

जळगाव दि. २५ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने खुल्या महाविद्यालयीन निवडणूका संदर्भात गुरुवार, दि.२७ जून, २०१९ रोजी विद्यापीठात कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

ही कार्यशाळा संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, संचालक, विद्यार्थी विकास अधिकारी यांच्यासाठी विद्यापीठाच्या अधिसभागृह (सिनेट हॉल) येथे दि. २७ जून, २०१९ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

सकाळी ११ वाजता कार्यशाळेचे उद्घाटन होणार असून यावेळी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्राचार्य अनिल राव, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्य.प.सदस्य दिलीप पाटील, प्राचार्य एल.पी.देशमुख, कुलसचिव भ.भा.पाटील उपस्थित राहतील. उद्घाटनानंतर प्राचार्य अनिल राव हे विद्यार्थी परिषद निवडणूक आराखडा विषयी माहिती देतील. त्यानंतरच्या सत्रात दुपारी १२.३० वाजता विद्यार्थी परिषद निवडणूक नियमावली या विषयी प्राचार्य डॉ.एल.पी.देशमुख, निवडणूक कार्यक्रम वेळापत्रकाविषयी प्राचार्य डॉ.उदय कुलकर्णी बोलतील. त्यानंतर प्रश्नोत्तर व चर्चा होईल. दुपार २.३० वाजताच्या सत्रात कुलसचिव भ.भा.पाटील हे लोकपाल आणि विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष या विषयी तर डॉ.राम भावसार हे दिव्यांग सेवा-सुविधा कक्षासंदर्भात करावयाची कार्यवाही या विषयावर संवाद साधतील. प्रा.सत्यजित साळवे हे विद्यार्थी विकास योजना उपक्रमाविषयी माहिती देतील. ४ वाजता प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे,अशी माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा.सत्यजित साळवे यांनी दिली.

---

जा.क्र. : कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : २५ जून, २०१९

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी